# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ३ चे इतिवृत्त

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **गुरूवार दिनांक ०८/०२/२०२४ सकाळी ११-०० वाजता स्व.अटलबिहारी वाजपेयी मुख्य सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. त्या सभेचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करूणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | डॉ.संगीता नांदूरकर | उपायुक्त |
| ४. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ५. | श्रीमती पल्लवी शिरसाठ | मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी |
| ६. | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ७. | श्री.सुनिलकुमार सुर्यवंशी | प्र.मुख्य लेखा परिक्षक |
| ८. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ९. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| १०. | श्री.कैलास शिंदे | अभियंता |
| ११. | डॉ. एम.आर.शेख | आरोग्याधिकारी |
| १२. | श्री.लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १३. | श्री. किशोर सुडके | परवाना विभाग / बाजार विभाग |
| १४. | श्री. एन. के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५. | श्री.संजय मोरे | कार्यालयीन अधीक्षक |
| १६. | श्री.राजेंद्र माईनकर | प्र.भांडारपाल |
| १७. | श्री. प्रकाश सोनवणे | कनिष्ठ अभि. नगररचना विभाग |
| १८. | श्री. अतुल पाटील | लिडींग फायरमन |
| १९. | श्री.राजेश गायकवाड | मनपा शिक्षण मंडळ |
| २०. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २१. | श्री.संभाजी सुडके | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २२. | श्री.चंद्रकांत जाधव | मलेरिया पर्यवेक्षक |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

म.नगरसचिव — आजच्या स्थायी समितीची सभा सुरू करण्यापुर्वी धुळे महानगरपालिकेत राज्यशासनाच्या आदेशाप्रमाणे दोन उपायुक्ताची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यात श्री.हेमंत निकम, श्रीमती शोभा बाविस्कर यांची नियुक्ती झालेली आहे. श्री.निकम साहेब हे काही कारणास्तव आजच्या सभेस उपस्थित राहू शकले नाही. श्रीमती शोभा बाविस्कर हे आजच्या सभेस उपस्थित आहे. त्यांचा धुळे महानगरपालिकेच्या वतीने पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

म.नगरसचिव — विषय पत्रिकेवरील विषयांना सुरूवात करण्यात येत आहे.

विषय क्रमांक:-२१ — मानधनावरील वैद्यकीय अधिकारी(आयुर्वेदीक) यांच्या मानधनात वाढ करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. उपायुक्त — श्री योगेश शालीग्राम पाटील हे वैद्यकीय अधिकारी (आयुर्वेदिक) हे कोरोना काळापासून कार्यरत होते. त्यावेळी बीएएमएस पदासाठी जाहिरात कोरोना कालावधीसाठी शासनाने काढली होती. नंतरच्या काळात तो कालावधी लॅप्स झाल्यानंतर ते पद ही आपोआप लॅप्स होते. शासन नियमानुसार मॅण्डेटरी होते. परंतु त्या काळात त्यांनी केलेल्या कामावरुन व शहरासाठी केलेल्या सेवेवरुन हे पद जरी लॅप्स झालेले असले तरी मानधन तत्वावर त्यांना कंटीन्यु करण्याचा निर्णय मनपाने घेतला होता. त्यांचे मानधन पूर्वी रु.३० हजार होते. त्यांनी मधल्या काळात कायमस्वरुपी करण्याबाबत विनंती ही सादर केली होती. परंतु तशी कायदेशिर तरतूद नसल्यामुळे ते प्रपोझल आपण करु शकलो नाही. परंतु त्यांच्या मानधनामध्ये त्यांनी केलेल्या कामाचा आदर करुन मानधन वाढ करण्याबाबत हा प्रस्ताव स्थायी समितीपुढे आला आहे. त्या वाढ करण्याबाबत हा प्रस्ताव स्थायी पुढे आला आहे. त्या अनुषंगाने त्यांचे मानधन रु. ३० हजार वरुन रु. ४५ हजार पर्यंत करावे अशी मागणी आपण केली आहे. हा प्रस्ताव लेखा विभागाकडून मंजूर करुन घेऊ. मनपा अधिनियमातील विशेष तरतुदी नुसार प्रशासकांच्या विशेष अधिकारामध्ये मंजूरीसाठी स्थायी समितीपुढे हा विषय सादर केला आहे. प्रस्तावास शिफारस आहे.

म.प्रशासक — आता आपण रुपये १० हजार वाढ करु आणि आरोग्य विभागाच्या आरोग्यवर्धीनी अंतर्गत त्यात पंचकर्म युनिट होणार आहे. सध्या १० हजार रुपये वाढवण्यात येऊन आणि ६ महिन्यानंतर युनिट चांगले सुरु झाल्यानंतर आणखी ५ हजार रुपयाची वाढ करु सदर प्रस्तावास १० हजर रूपये मानधन वाढ करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक २१ दिनांक ०८/०२/२०२४**

दि.०३/११/२०२३ रोजी श्री योगेश शालीग्राम पाटील, वैदयकीय अधिकारी (आयुर्वेदीक) यांनी विनंती पूर्वक अर्ज सादर करुन मानधन वाढ करुन मिळणेबाबत विनंती केलेली होती. धुळे महानगरपालिकेकडून राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (एनयुएचएम) अंतर्गेत वैदयकीय अधिकारी पूर्णवेळ साठी शैक्षणीक पात्रता एमबीबीएस व मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन या पदासाठी रु. ६०,०००/- मात्र मानधनावर जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती.

श्री डॉ. योगेश शालीग्राम पाटील, मानधनावरील वैदयकीय अधिकारी (आयुर्वेदीक) यांची शैक्षणीक पात्रता बीएएमएस आहे. व त्याअनुषंगाने त्यांना रु. ३०,०००/- मानधनावरुन रु. ४५,०००/- किंवा रु.५०,०००/- मानधनवाढ बाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. डॉ श्री योगेश पाटील यांच्या मानधनात रु. १५,०००/- किंवा रु. २०,०००/- मानधन वाढ केल्यास आस्थापना खर्चाची टक्केवारी ००.०१ टक्के इतकीच वाढ होणार आहे.

त्याअनुषंगाने आस्थापना विभागामार्फत सादर केलेल्या प्रस्तावानुसार डॉ.योगेश पाटील यांना सद्यास्थितीत पुढील ६ महिने कालावधीसाठी रक्कम रु.१०,०००/- मानधन वाढ करणेस वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/-x x x**

**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-२२ | पाणी अपव्यय टाळण्यासाठी आणि सुयोग्य पाणी नियोजनासाठी पाणी मीटर तसेच प्रेशर मीटर बसविणे आणि पाणी वितरणासाठी ऑटोमेशन सिस्टीम बसविणेकामी सल्लागाराची नेमणूक करणेसाठी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.कार्य.अभियंता | महासभेने वॉटर मिटर, प्रेशर मिटर आणि ऑटोमेशन सिस्टीम बसवणे कामी सल्लागाराची नेमणूकीसाठी मंजूरी दिली होती. त्या अनुषंगाने विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन ई निविदेने प्रस्ताव मागवले होते. त्या अंतर्गत २ संस्थांनी त्यांचे देयक दर दिले होते. त्या दराच्या अनुषंगाने मे. टेक्टॉनिक रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट बार्शी यांनी ०.२५% कमी दराने निविदा आली आहे. हा दर योग्य वाटतो आहे. त्यास मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव सादर केला आहे.प्रस्तावास शिफारस आहे. |
| म.प्रशासक | दराला मंजूरी देऊच वर्क ऑर्डर करा पण काम अचारसंहितेआधी सि.एम. ऑफिसला प्रस्ताव जाणे आणि उर्वरित काम झाले पाहिजे. |
| म.कार्य.अभियंता | याबाबत आपण दक्षता घेऊ. |
| म.अति.आयुक्त | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक २२ दिनांक ०८/०२/२०२४**

धुळे मनपा अंतर्गत पाणी अपव्यय टाळण्यासाठी आणि सुयोग्य पाणी नियोजनासाठी पाणी मीटर तसेच प्रेशर मीटर बसविणे आणि पाणी वितरणासाठी ऑटोमेशन सिस्टीम बसविणे कामी सल्लागाराची नेमणूक करणेसन २०२३-२४, कामास मा. आयुक्तसो. यांनी जा.क्र./

धुमपा/पा.पु./१४७/२०२३-२४ दि.१५/०१/२०२४ अन्वये ७,०८,०००/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्यकारी अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४६/२०/२४ दि.१६/०१/२४ अन्वये रक्कम रु. ७,०८,०००/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **टेक्टॉनिक रिसर्च अँड डेव्हलपमेंट** यांचे दर **शे.०.२५% कमी** दराने आहे. सबब कंत्राटदार **टेक्टॉनिक रिसर्च अँड डेव्हलपमेंट** यांची **शे.०.२५% कमी** आलेल्या दरास व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-२३ मुलभूत सेवा-सुविधा योजनेअंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत धुळे मनपा हद्दीत १ ते ३ ठिकाणी रस्ता व गटार करणेकामी निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता शासनाच्या मुलभुत सोयी सुविधा या १००% अनुदाना अंतर्गत सदर कामासाठी प्रशासकीय मंजूरी मा. जिल्हाधिकारी यांनी दिली आहे. याबाबत ई निविदा मागवण्यात आली होती. यात ते हिंद कन्स्ट्रक्शन यांचे सर्वात कमी दर आले आहे. त्यांनी आवश्यक बयाणा रक्कम भरलेली आहे. स्थायीपुढे दर मंजुरीसाठी सादर केले आहे. प्रस्ताव मान्य करणेस शिफारस करण्यात येत आहे.

म.कार्य.अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक २३ दिनांक ०८/०२/२०२४**

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधा अंतर्गत सन २०२३- २४ अंतर्गत ०१ ते ०३ ठिकाणील रस्ते करणे कामांबाबतच्या कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष — ५ / नपाप्र / बांध / ११५६ दि.२९/११/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.१,९९,९९,०९९/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. १३३ , १३२ व १३१ दि.०१/०९/२०२३ अन्वये तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे. सबब कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांच्या **अंदाजपत्रकीय**

आलेल्या दरास व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/-x x x**

**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-२४ मुलभूत सेवा-सुविधा योजनेअंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत धुळे मनपा हद्दीत १ ते ७ ठिकाणी रस्ता व गटार करणेकामी निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता सदरचा प्रस्ताव मुलभूत सोई सुविधा या शिर्षाखाली शासनाने १००% अनुदान उपलब्ध करुन दिल्याने मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. यात सुध्दा ई निविदा मागवली होती. सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दराची आली आहे. सदरचा विषय दर मंजूरीसाठी सादर केला आहे.प्रस्ताव मान्य करणेस शिफारस करण्यात येत आहे.

म.कार्य.अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक २४ दिनांक ०८/०२/२०२४**

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधा अंतर्गत सन २०२३- २४ अंतर्गत ०१ ते ०७ ठिकाणील रस्ते करणे कामांबाबतच्या कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष – ५ / नपाप्र / बांध / ११५७ दि.२९/११/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.४,९९,९७,६९५/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. १५८,१५९, १६०, १६१, १६२, १६३, १६४ दि.०१/०९/२०२३ अन्वये तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे. सबब कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले दरास व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/-x x x**

**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-२५ | मुलभूत सेवा-सुविधा योजने अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत धुळे मनपा हद्दीत १ ते १३ ठिकाणी रस्ता व गटार करणेकामी निविदा दर मागविण्यात आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म. अभियंता | मा.आमदार कुणाल पाटील यांच्या पत्रावरुन सदर कामांना मुलभुत सोई सुविधा अंतर्गत मा. जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. यात ई निविदा मागवली होती. यात अंदाजपत्रकीय दराची निविदा मे. हिंद कन्स्ट्रक्शन यांची आली आहे. दर मंजूरीसाठी स्थायी समितीपुढे सादर केलेआहे. प्रस्ताव मान्य करणेस शिफारस करण्यात येत आहे. |
| म.अति.आयुक्त | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक २५ दिनांक ०८/०२/२०२४**

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधा अंतर्गत सन २०२३- २४ अंतर्गत ०१ ते १३ ठिकाणील रस्ता कॉंक्रीट, ओपनस्पेस सुशोभिकरण, उद्यान विकसित करणे, रस्ता डांबरीकरण करणे, पाईप लाईन टाकणे करणे कामांबाबतच्या कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष — ५ / नपाप्र / बांध / ३३ दि.१०/०१/२०२४ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.९,९९,९७,५८१/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.४२५,४२६,४२७, ४२८,४२९,४३०,४३१,४३२,४३३,४३४,४३५,४३६,४३७दि.०७/१२/२०२३अन्वये तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे. सबब कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले दरास व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-२६ | मुलभूत सेवा-सुविधा योजने अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत धुळे मनपा क्षेत्रात प्र.क्र.१५ साई एकता कॉलनी गायकवाड ते अहिरे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणेकामी निविदा दर मागविण्यात. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |

म.अभियंता	या विषयात मुलभूत सोई सुविधा अंतर्गत धुळे शहराचे आमदार मा. फारुख शाह यांनी शिफारस केल्यावरुन कामाला मंजूरी मिळाली होती. मा. जिल्हाधिकारी साहेबांनी याला प्रशासकीय मान्यता दिली आहे. यात अंदाजपत्रकीय दर प्राप्त झाले आहे. दरमंजूरीसाठी स्थायीपुढे सादर केले आहे.सदर प्रस्ताव मान्य करणेस शिफारस करण्यात येत आहे.

म.अति.आयुक्त	सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक	सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक २६ दिनांक ०८/०२/२०२४**

मुलभूत सोई सुविधा विकास योजना अंतर्गत धुळे महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग क्रमांक 15 साईएकता कॉलनी गायकवाड ते अहिरे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे. सन २०२३-२४ कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष - ५ / नपाप्र / बांध /१३१२ दि.२०/११/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.३९,९२,०८३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ८५/२०२३ दि. दि.०९/०८/२०२३ अन्वये रक्कम रूपये ३९,९२,०८३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **साजीद अली शाह** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे. सबब कंत्राटदार **साजीद अली शाह** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले दरास व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-२७	मुलभूत सेवा-सुविधा योजने अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत धुळे मनपा क्षेत्रात प्र.क्र.१२ गफुर नगर वडजाई रोडपासून ते मोईन भंगारवाला पावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणेकामी निविदा दर मागविण्यात. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव	नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता	या विषयात मुलभुत सोई सुविधा अंतर्गत धुळे शहराचे आमदार मा. फारुख शाह यांनी शिफारस केल्यानंतर प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. यात ई निविदा मागवली होती. त्यात रिजवान अहमद युसुफ पटेल यांची अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी दराची निविदा आहे. दरमंजूरीसाठी स्थायी समितीपुढे सादर केले आहे. सदर प्रस्ताव मान्य करणेस शिफारस करण्यात येत आहे.

म.प्र.मुख्यलेखापरिक्षक	सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक २७ दिनांक ०८/०२/२०२४**

मुलभूत सोई सुविधा विकास योजना अंतर्गत धुळे महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग क्रमांक १२ गफुर नगर वडजाई रोडपासून ते मोईन भंगारवाला पावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे. सन २०२३-२४ कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष - ५ / नपाप्र / बांध /१३१२ दि.२०/११/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.४९,८५,०८९/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ८३/२०२३-२४ दि. दि.०९/०८/२०२३ अन्वये रक्कम रूपये ४९,८५,०८९/- मात्र खर्चांस तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **रिजवान अहमद युसूफ पटेल** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे. सबब कंत्राटदार **रिजवान अहमद युसूफ पटेल** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले दरास व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/-x x x**

**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-२८ अल्पसंख्याक क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत प्र.क्र.९ मध्ये १ ते ७ कामे करणेकामी निविदा दर मागविण्यात. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता अल्पसंख्याक क्षेत्र विकास अंतर्गत शासनाने व मा.जिल्हाधिकारी यांनी आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली होती. ई-निविदा मागविण्यात आली होती त्यात मे.हेमंत राजाराम बागुल यांचे शे.०.९९% टक्के कमीने निविदा दर प्राप्त झाली होती. त्यानुसार सदर विषय स्थायी समितीपुढे मंजूरीस्तव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव मान्य करणेस शिफारस करण्यात येत आहे.

म.कार्य.अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक २८ दिनांक ०८/०२/२०२४**

अल्पसंख्यांक क्षेत्र विकास अंतर्गत प्रभाग क्र.०९ मध्ये १ ते ७ कामे. सन २०२३-२४ कामास मा.जिल्हाधिकारी सो. यांचे जा.क्र.१२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/१४८३/२०२३

दि.२२/१२/२०२३ अन्वये **९९,६४,८५०/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.४१७,४१८,४१९,४२०, ४२१, ४२२,४२४/ २०२३ दि.०७/१२/२०२३ अन्वये रक्कम रु**. ९९,६४,८५१/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **हेमंत राजाराम बागुल** यांचे दर **शे.-०.९९९% कमी** दराने आहे. सबब कंत्राटदार **हेमंत राजाराम बागुल** यांची **शे.-०.९९९% कमी** दराने आलेले दरास व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-२९ — महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत धुळे मनपा हद्दीत १ ते ६४ कामे करणेकामी निविदा दर मागविण्यात. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता — यामध्ये रुपये 52 कोटी 22 लाख 78 हजार 69 जीएसटी वगळून मात्रची निविदा आहे. मे. स्वामी जे.व्ही. यांचे शे. 2% जास्तीने दर आले होते. ठेकेदारांशी वाटाघाटी करुन अंदाजपत्रकीय दराने त्याने काम करण्याची तयारी दर्शविली आहे. यामध्ये मनपाचा हिस्सा टाकणे आवश्यक आहे. त्या हिस्स्याच्या रकमेबाबत अंदाजपत्रकात तरतूद करुन सदरचा विषय मंजूरीसाठी स्थायीपुढे सादर केले आहे.सदर प्रस्ताव मान्य करणेस शिफारस करण्यात येत आहे.

म.मुख्य लेखाधिकारी — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक २९ दिनांक ०८/०२/२०२४**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत धुळे शहराला रस्ते विकास प्रकल्प १ ते ६४ कामे करणे बाबतच्या सन २०२३-२४ कामास उपसचिव महाराष्ट्र शासन निर्णय नगरो/२०२३/प्र.क्र.५३४/नवि-३३ दि.०४/१२/२०२३ अन्वये रु.५२,२२,७८,०६९/- (GST वगळून) रु.६२,७७,६५,८००/-(GST सह) मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत मुख्य अभियंता सार्व.बांधकाम विभाग नाशिक पत्र का-२/रस्ते-३/नप/२४१६/२०२३ दि.२३/०५/२०२३ वजा.क्र. -२/रस्ते-३/नप/२३९८/२०२३ दि.२२/०५/२३ अन्वये रक्कम रु**. ५२,८७,१०,७५१/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **स्वामी जे. व्ही.** यांना दरवाटा घाटीबाबत मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने लेखी पत्र देवून कळविण्यात आले याबाबत ठेकेदार **स्वामी जे. व्ही.** यांनी दि.०५/०२/२०२४ रोजी पत्र देवून सदर कामी अंदाजपत्रकीय दराने काम करण्याबाबत समंतीपत्र सादर केलेले आहे. सबब कंत्राटदार **स्वामी जे. व्ही.** यांची **अंदाजपकत्रकीय दराने** आलेले दरास व प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. तसेच याकामी ३० टक्के मनपा हिस्सा अदा करणेसाठी अंदाजपत्रकात तरतूद करणेस वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-३० स्थानिक संस्था कर विभागातील नोंदणीकृत व्यापारी यांची निर्धारणा तपासणी करीता मनपा अधिकारी प्राधिकृत करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.बाजार वि. प्र. स्थानिक संस्था कर 2010 अन्वये सर्व अधिकार आयुक्तांना देण्यात आले होते ते अधिकार अति. आयुक्त, उपायुक्त कर निर्धारण अधिकारी व अधिक्षक यांना जबाबदारी देणे कामी विषय स्थायीपुढे आला आहे. कलम 68 अन्वये स्थायीची मंजूरी घेणे गरजेची आहे. मंजूरीसाठी स्थायी समितीपुढे सादर केले आहे. सदर प्रस्ताव मान्य करणेस शिफारस करण्यात येत आहे.

म.आयुक्त कामाला कधी पासुन सुरवात करणार आहे.

म.बाजार वि. प्र. नोटीस बजावण्याचे काम सुरु आहे. आजपावेतो 60 ते 70 नोटीस गेल्या आहे. मध्यंतरी मराठा सव्हेक्षणामुळे कर्मचारी उपलब्ध नव्हते.

म.आयुक्त तत्कालीन उपायुक्त नाईक मॅडमांच्या काळात जेवढे असेसमेंट झाले त्यानंतर विवरण झाले ते काम प्राधान्याने घ्यावे. संपूर्ण टीम नेमावी. काम मार्च एंड पर्यंत काही करुन संपवायचे आहे.

म.करमुल्य निर्धारण अधिकारी सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३० दिनांक ०८/०२/२०२४**

स्थानिक संस्था कर विभागातील नोंदणीकृत व्यापारी यांनी सादर केलेले विवरण पत्र निर्धारणाकामी संदर्भ क्र. १नुसार नियम ३३ मध्ये स्थानिक संस्था कर अंमलबजावणी/ निर्धारणा करणे बाबतचे नमुद आहे. नियम २६ (३) मध्ये या नियमाखाली दिलेल्या अधिकाराचा वापर आयुक्त किवा आयुक्ताच्या पुर्व परावानगी ने उपायुक्त पेक्षा कमी नसलेल्या दर्जाचे अधिकारी करेल असे नमुद आहे, तथापी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५२ इ उपकर प्राधिकारी हे सन २०२३ च्या चोविसावी आवृती तुन वगळण्यात आलेले आहे.

पंरतु स्थानिक संस्था कर विभागाचे काम हे सन २०१३-१४,२०१४-१५,व २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाचे निर्धारणा तपासणी चे काम करणे असल्याने त्यावेळेस अस्थीत्वात असलेले नियमाच्या अनुषगांने अधिकार प्रधान करु शकतील.

यास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६८(२) व ६९ नुसार मा.आयुक्त सो. मे.स्थायी समितीच्या परवानगी ने महाराष्ट महानगरपालिका(स्थानिक संस्था कर) नियम २०१० मधील खाली नमुद केलेल्या स्थानिक संस्था कर विभागाकडील अधिकारी यांना त्याच्या पदा समोर दर्शविलेल्या प्रमाणे अधिकार,कर्तव्य व जबाबदारी सोपवण्यात येतील.

| अ.क्र | पदनाम | महाराष्ट महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट महानगरपालिका(स्थानिक संस्था कर) नियम २०१० नुसार सोपवलेले अधिकार व जबाबदाऱ्या |
|---|---|---|
| १ | अति.आयुक्त | १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६८ (२) व ६९ व १५२ नुसार मा.आयुक्त सो. मे.स्थायी समितीच्या परवानगी ने<br>२. स्थानिक संस्था कर विभगाचे नियंत्रण अधिकारी/अपीली अधिकारी<br>३. महाराष्ट्र महानगरपालिका(स्थानिक संस्था कर) नियम २०१० नियम मधील सर्व नियम |
| २. | उपायुक्त तथा कर मुल्य निर्धारण व संकलण अधिकारी/ उपायुक्त | १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६८ (२) व ६९ व १५२ नुसार मा.आयुक्त सो. मे.स्थायी समितीच्या परवानगी ने<br>२. महाराष्ट्र महानगरपालिका(स्थानिक संस्था कर) नियम २०१० नियम २३ नियम २८ ,२९(३), ३१,५२(३)(४) व ५४ व्यतीरीक्त सर्व नियम |
| ३. | अधिक्षक | १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६८ (२) व ६९ व १५२ नुसार मा.आयुक्त सो. मे.स्थायी समितीच्या परवानगी ने<br>२. महाराष्ट्र महानगरपालिका(स्थानिक संस्था कर) नियम २०१० नियम २३नियम २४,२७,२८,२९(३),३०,३१,३२,३३,३६,३७,३८, ४३,४५,४६,५०, ५२(३)(४)]५३ व ५४ व्यतीरीक्त सर्व नियम |

सदरचा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६८ (२) व ६९ नुसार मा.आयुक्त सो. मे.स्थायी समितीच्या परवानगी ने अधिकार मा.आयुक्त सो. वेळोवेळी आदेशाद्वारे घालुन देईल अशा शर्तीच्या व निर्बधाच्या अधिन राहुन त्यांच्याकडे सर्वसाधारण सोपविलेल्या अधिकाराचा वापर करतील व ती कर्तव्य पार पाडतील येणे प्रमाणे आदेश होणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५२ इ उपकर प्राधिकारी नेमणुक करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांना आहेत. त्यानुसार अहवालात नमूद मनपा अधिकारी यांना प्राधिकृत करण्याच्या प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-३१ स्थानिक संस्था कर विभागातील निर्धारण तपासणीकरीता C.A.(सनदी लेखापाल) यांची नियुक्ती करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

| | |
|---|---|
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.बाजार वि. प्र. | सद्यस्थितीत नियुक्त केलेल्या कर्मचारी यांची संस्था कमी आहे. भविष्यात लेखा परिक्षणात अडचणी येऊ नये तसेच निर्धारण करण्यास विलंब झाल्यास कर वसुल होण्यास अडचणी येतील. कामकाज गतिमान होण्याकामी सनदी लेखापाल नियुक्त करण्यासाठी सदर विषय स्थायीपुढे सादर केले आहे. सदर प्रस्ताव मान्य करणेस शिफारस करण्यात येत आहे. |
| म.आयुक्त | हे करतांना निविदा पब्लीकेशन करावी लागेल त्यात 8 दिवसापेक्षा जास्त मुदत देऊ नये. अचार संहितेमुळे काम अडकून पडेल. याची काळजी घ्यावी. |
| म.करमुल्य निर्धारण अधिकारी | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३१ दिनांक ०८/०२/२०२४**

ई-निविदा सुचना क्र.८६ दि.२९/८/२०२२ रोजी निविदा प्रसिध्द् करण्यात येऊन दर मंजुरी करीता मे.स्थायी समिती समोर सादर केले असता म.न.पा स्थायी समिती ठराव क्र.१२४ दि.२०/०७/२०२३ रोजी सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार खाजगी सी.ए व त्या संस्थोमार्फत स्थानिक संस्था कर निर्धारण तपासणीकरिता आक्षेप असल्याने यापुर्वी काढण्यात आलेली निविदा रद्द करुन स्थानिक संस्था कर निर्धारणा तपासणी करिता मानधन तत्वावर सेवानिवृत सेवाकर विभागातील अधिकारी नियुक्त करणेस मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनाने मनपा हिताच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व प्रशासकीय पूर्तता करण्यांत यावी असे नमुद आहे.

विभागात निर्धारणा तपासणी कामाचा आवाका पाहता पुरेसे कर्मचारी नाही तसेच निर्धारणा करण्यास विलंब झाल्यास कर वसुल होणेस अडचणी येतील तसेच लेखापरिक्षण व न्यायालयीन वाद विवाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी संदर्भीय निर्देशानुसार स्थानिक संस्था कर विभागातील निर्धारणा तपासणी कामकाज गतिमान होण्याकामी C.A(सनदी लेखापाल) नियुक्त करणेस व स्थानिक संस्था कर विभागातील निर्धारण तपासणीकरीता C.A.(सनदी लेखापाल) यांची नियुक्ती करणेकामी विहित अल्पमुदतीची निविदा प्रक्रिया करणेबाबत तातडीने कार्यवाही करणेस वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/-x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**